माझे नाव शुभम सुनिल चौधरी आहे. माझे गाव मलकापूर आहे. माझे वय 20 वर्षे आहे. मी आज बी. ई. इंजिनीरिंगच्या तिसऱ्या वर्षाला आहे. मी 10 वी नंतर डिप्लोमा अ‍ॅडमिशन घेतली आणि पुर्ण झाल्यावर डिग्रीला नाशिक येथे संदीप फाऊंडेशन कॉलेजला घेतली. 15-03-2020 या दिवशी कोरोना महामारीमुळे सगळीकडे लॉकडाऊन झाला. तर मी मलकापूरला घरी परतलो. माझ्या जीवनात लॉकडाऊन नंतर सहा महिने सगळे सुरळीत चालू होते. पण सप्टेंबर महिन्यात अचानक मला Typhoid झाला. मी Typhoid ची ट्रिटमेंट घेतली. मी ठीक सुद्धा झालो. नंतर काही दिवसांनंतर मला कोणत्याही वस्तुचा घाण वास येत होता. त्यामुळे आम्ही डॉक्टरांचा सल्ला घेतला डॉक्टरांनी सांगितले Typhoid मुळे असा घाण वास येऊ शकतो. त्यामुळे मी त्याकडे दुर्लक्ष केले पण माझे जेवण दिवसेंदिवस कमी होत गेले व मला थकवा जाणवत होता. दवाखान्यात गेल्यानंतर तपासणी केली असता डॉक्टरांनी सांगितले अजुन Typhoid आहे. परत ट्रिटमेंट सुरु केली. नंतर त्रास वाढत असल्यामुळे परत टेस्ट केली तर काविळ आणि डेंगु आहे. याची ट्रिटमेंट सुरु केली. पण 25/11/2020 या दिवशी मला जास्त प्रमाणात ताप आला व अंग पण जास्त दुखत होते. मग आम्ही जळगाव ला जायचे ठरविले. पण मनात एक धास्ती होतीच की कोरोना महामारीमुळे मला कोणते डॉक्टर घेतील का नाही. मग आम्ही आमचे परिचित डॉक्टर अल्का पाटील यांच्याकडे गेलो. त्यांनी सर्वांच रिपोर्ट काढायला सांगितले. रिपोर्ट मिळाल्यानंतर रिपोर्टमध्ये पहिले कोणतेच आजार मिळाले नाही तर नविनच आजार समोर आला त्यामुळे त्यांचा पण विश्वास बसत नव्हता त्याकरिता त्यांनी माझे रिपोर्ट परत काढण्यास सांगितले व रिपोर्ट बघताच त्यांना पण धक्का बसला. माझ्या आईला व मोठ्या भावाला त्यांनी बाजुला बोलवून माझ्या किडणीच्या आजारा विषयी सांगितले. त्यांनी सांगितला क्षणी माझ्या आई व भावाची जणु पायाखालची जमीन

सरकल्या सारखे झाले. नंतर डॉक्टर अल्का पाटील यांनी मला डॉ. अमित भंगाळे ह्यांच्या नित्यसेवा हॉस्पिटल मध्ये जाण्याचा सल्ला दिला. तिथे गेल्यानंतर त्यांनी पण काही चाचण्या व सोनोग्राफी करून घेण्यास सांगितले. रिपोर्ट मिळाल्यानंतर समजले माझ्या दोनही किडणी 5% कार्य करत आहे. त्यामुळे लवकरात लवकर डायलिसीस करायला सांगितले नाही तर कोमात वगैरे जाऊ शकतो. मग माझे Line टाकून तुरंत डायलिसीस सुरु झाले आई - बाबांनी या आजाराबद्दल मला काहीच कळू दिले नाही. मला पण डायलिसीस बद्दल माहिती नव्हती. आठ दिवस जळगांव येथे उपचार घेतल्या. नंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार किडणी ट्रान्सप्लान्ट शिवाय पर्याय नव्हता आम्ही किडणी Transplant करायचे ठरवले. त्यांच्या मार्गदर्शना मुळे आम्हाला औरंगाबाद, पुणे आणि अहमदाबाद येथील हॉस्पिटल ची नावे समजले. मग आम्ही पुण्याच्या दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलची निवड केली. घरूनच आम्ही कोणत्या डॉक्टरांची ट्रिटमेंट घ्यायची हे ठरवले. आणि तुरंत पुण्याला आलो. आम्ही डॉ तुषार दीघे यांच्याकडे तपासणी केली व त्यांच्या सल्ल्यानुसार डायलिसीस आठवड्यातून दोनदा सुरु झाले. मग आमच्या समोर किडणी विषयी प्रश्न निर्माण झाला डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार घरच्या रक्तसंबंधाची किडणी मॅच होऊ शकते. मग आई आणि वडील दोनीही द्यायला तयार होते पण आईच्या म्हणण्यानुसार वडीलापेक्षा मीच देते. त्यामुळे आम्ही डॉक्टरांसमोर आईला समोर केले. नंतर आमच्या ऑपरेशन बद्दलच्या म्हणजे HLA Typing, 2D Echo वगैरे वगैरे तपासण्या सुरु झाल्या. आम्हाला सर्जनची भेट घेण्यास सांगितले. मग माझी सर्जरीसाठी डॉ वृशाली पाटील यांना भेटलो त्यांनी आम्हाला ऑपरेशन विषयी सर्व समजावून सांगितले त्यामुळे आम्हाला धीर आला. नंतर आईच्या सर्जरीकरता डॉ जयदीप दाते यांना भेटलो. आईच्या तपासण्या केले बाकी सर्व तपासण्या

लॅबमधून केल्या रिपोर्ट सर्व चांगले मिळाले. त्यामुळे आमची धास्ती अजून कमी झाली. नंतर आम्ही रसिका कुलकर्णी यांना भेटून ऑपरेशन लवकरात लवकर करण्याची मदत घेतली त्यांनी सर्वांचा सल्ला घेवून आमची मिटिंग ठरवली लवकरच आमची ऑपरेशनची तारीख ठरवली. आम्हीपण सर्व कागदपत्र काढून दिली होती. 11/01/2021 ला डॉ. जयदीप दाते व रोहण वालसंकर यांच्या सहकार्याने आईचे ऑपरेशन झाले आणि माझे डॉ. कुशाली पाटील, डॉ. निनाद देशमुख व डॉ तुषार डीघे यांच्या हातून माझे ऑपरेशन पार पडले. ऑपरेशन नंतर डॉक्टर व त्यांच्या कर्मचारी वर्गाकडून माझी केअर घेण्याबाबत चांगला प्रतीसाद मिळाला. आईला पण सर्वांकडून चांगला प्रतीसाद मिळाला. ईश्वरकृपेने आमचीपण तब्बेत लवकर ठीक झाली. त्यामुळे आम्हाला लवकर सुट्टी मिळाली. माझी ईश्वर चरणी ही प्रार्थना आहे की हा आजार कोणाला येऊ नये व आलाच तर उपचार हाच एक ईलाज आहे किंवा ऑपरेशन हाच त्याचा एकमेव पर्याय आहे. कोणीही या आजाराची मनात धास्ती धरु नये. औषध आणि स्वत:ची केअर घेणे हाच पर्याय आहे. ऑपरेशन झाल्यापासून मला आज आनंद वाटतो.

मी डॉक्टर व सर्व कर्मचारी वर्गाचा खुप खुप आभारी आहे.